मोटार वाहन विभाग
महाराष्ट्र शासन

विषय :- दि.०१/०४/२०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाने दि.०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (HSRP) पाटी बसविण्याचा निर्णय घेतला असून अशा जुन्या वाहनांना HSRP बसविण्याकरिता ३ संस्थाची / उत्पादकांची परिवहन विभागामार्फत निवड केली आहे. सर्व संबंधित वाहन मालकांनी वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (HSRP) पाटी बसविण्यासाठी केवळ परिवहन विभागाच्या **https://transport.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर भेट द्या आणि HSRP Online Booking लिंकवर क्लिक करा.

जुन्या वाहनांवर HSRP बसविण्यासाठी सायबर गुन्हेगारांनी बनावट लिंक/साईटस तयार केल्या असून त्याचेविरुध्द परिवहन विभागाने गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (HSRP) पाटी बसविण्यासाठी इतर कोणत्याही बनावट साईट/ लिंकचा वापर न करण्याची खबरदारी वाहन मालकांनी घ्यावी असे आवाहन परिवहन विभागातर्फे करण्यात येत आहे.

सह परिवहन आयुक्त (संगणक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.